जाहिरात

**वॉक इन इंटरव्ह्युद्वारे तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत**

**थेट मुलाखत**

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळांतर्गत असलेल्या सांगली जिल्हयातील उपजिल्हा/ग्रामिण रुग्णालयातील महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा (गट अ) यांची रिक्त पदे तदर्थ वैद्यकिय अधिकारी म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

१. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हताधारक नियमित/बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत राहील.

२. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यासारखे म.ना.से. (रजा) नियम लागू राहणार नाही. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाही. त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही.

४. कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५. केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६. निवड झालेल्या तदर्थ वैद्यकिय अधिकारी यांना मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे. तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

७. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्यास निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

८. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

९. शासन आदेश क्र.मवैअ/२०२१/प्र.क्र.१५२/सेवा-३/ दि.२९ मे २०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे एम.बी.बी.एस. पात्रताधारकांना आदिवासी भागाकरीता दरमहा रु.८०,०००/- व इतर भागासाठी रु. ७५,०००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल. तसेच विशेषतज्ञांना आदिवासी भागाकरीता रु.९०,०००/- व इतर भागासाठी रु. ८५,०००/- एवढे मानधन देण्यात येईल. तसेच शासन निर्णयात उर्वरित नमूद अटी व शर्ती बंधनकारक राहतील. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. १००/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करण्यात येईल.

१०. तदर्थ वैद्यकिय अधिकाऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभाग, शा.नि. दि. ०२/०३/२०१५ व दि.२१/०४/२०१५ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत एम.बी.बी.एस. व विशेषज्ञ पदव्युत्तर पदवी/पदविका यांचे सर्व वर्षांचे गुणपत्रिका, पदविका/पदवी प्रमाणपत्र, वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलिकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतींचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनाधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढून टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. सदर भरतीबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवणेत आलेले आहेत.

**अ) शैक्षणिक अर्हता :- एम.बी.बी.एस अर्हता/ विशेषज्ञ पदव्युत्तर पदवी/पदविका**

ब) अर्ज स्विकारणेचे ठिकाण व दिनांक :-**जिल्हा शल्य चिकित्सक,सांगली यांचे कार्यालय ,प.व.पा.शा.रु.सांगली आवार (७७ नं) व जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. सांगली येथे दि.२३ /०८/२०२३ पासुन दि.३०/०८/२०२३ पर्यंत सायं. ५.३० वाजेपर्यंत समक्ष स्विकारले जातील. (अर्जाचा नमुना सोबत जोडलेला आहे.)**

**(मुलाखतीची स्थळ,दिनांक व वेळ - मा.जिल्हाधिकारी कार्यालय , विजयनगर,सांगली**

**दि.०१/०९/२०२३ रोजी स.१२.०० वा**

क) संपर्क क्रमांक व ई - मेल आयडी :- ०२३३ - २३७३०३२ **E Mail – cssangli10@gmail.com ,zpdhosan@yahoo.co.in**

स्वाक्षरी/-
सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
जिल्हा शल्य चिकित्सक, सांगली.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

## जिल्हास्तरीय निवड समिती, द्वारा जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, सांगली

## अर्जाचा नमुना

विषय :- महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट अ या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणेसाठी पात्र व इच्छुक उमेदवाराने भरावयाचा अर्ज (मुळ प्रतीत)

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव (आडनाव प्रथम) :-

२) जन्मतारीख :- अर्जाच्या दिनांकास वय :-

(दिनांक) (महिना) (वर्ष)

३) शैक्षणीक अर्हता :- एम.बी.बी.एस./(पदवी)

४) महाराष्ट्र वैद्यकिय परिषद (एमएमसी) येथे कायम नोंदणी केल्याचा क्र.व दिनांक :-

५) पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक असल्यास विषय :-

६) संपर्क मोबाईल क्र.- ईमेल -

७) एम.बी.बी.एस./पदवी / उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नाव :-

८) एम.बी.बी.एस./एम.बी.बी.एस.(पदवी) परिक्षेतील गुण खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | वर्ष | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्रयत्न संख्या | पैकी गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष | | | | | |
| २ | द्वितीय वर्ष | | | | | |
| ३ | तृतीय वर्ष - १ | | | | | |
| ४ | तृतीय वर्ष - २ | | | | | |
| ५ | **अंतीम वर्षाचे गुण** | | | | | |

९) सार्वजनिक आरोग्य विभागातील काम केल्याचा अनुभव असल्यास कालावधी :-

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | एकूण कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

११) कायमचा पत्ता :-

१२) बंधपत्रित/अबंधपत्रित (बंधपत्रित असल्यास कॉलेजचे पत्र व परिमंडळाचे ना हरकत पत्र जोडावे.)

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करतो/करते कि, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुशंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहीन.

**दिनांक : / /२०२३**

**ठिकाण :**

**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(उमेदवाराचे संपूर्ण नांव)**

खालील प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत जोडलेल्या आहेत.

१. जन्मतारखेचा दाखला/१० वी पास प्रमाणपत्र
२. एमबीबीएस/बी.ए.एम.एस उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका (सर्व वर्षाच्या)
३. पदव्युत्तर पदवी/पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र
४. महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र (एमएमसी)
५. आंतरवासियता प्रमाणपत्र
६.अनुभव असल्यास दाखला-प्रमाणपत्र
७.ॲटेम्प्ट सर्टिफिकेट